सुविचार

उच्चारावरून विद्वता, आवाजावरून नम्रता, आणि वर्तनावरून शील समजते.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com



वाढत्या उष्णतेचा भाजीपाला पिकावर परिणाम; -पेज- ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 85 ■ सोमवार दि.5 मे 2025 ■ RNI NO-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# टक्केवारीच्या विद्यापीठाचे कुलगुरू कोण..?

## पुराव्यानिशी समोर आणणार, भाजपच्या नेत्यांचा उबाठा गटाच्या नेत्यांना इशारा, भुयारी गटारच्या कामातून टक्केवारी, रस्त्याच्या कामात खोडा घातल्याचा आरोप

आरंभ मराठी / धाराशिव

शहरातील १४० कोटींच्या रस्त्याच्या कामात खोडा घालणाऱ्या आणि भुयारी गटारच्या कामातून टक्केवारी घेणाऱ्या शिवसेना उबाठा गटाच्या स्थानिक नेत्यांची लवकरच पुराव्यानिशी पोलखोल करणार असल्याचे सांगत टक्केवारीच्या विद्यापीठाचे कुलगुरू आणि सहकुलगुरु कोण आहेत, हे लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचा गंभीर इशारा भाजपने दिला आहे.त्यामुळे भाजप विरुद्ध शिवसेना उबाठा गटामध्ये सुरू असलेले राजकारण अधिक तापणार असल्याचे दिसत आहे.

धाराशिव शहरातील १४० कोटींच्या रस्त्याच्या कामावरून राजकारण पेटले आहे. या कामासाठी आलेली निविदा अंदाजपत्रकापेक्षा १५ टक्के अधिक दराने असल्याने ही निविदा मंजूर न करता अंदाजपत्रकानुसार काम काम केले जावे,अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आली होती. या मागणीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीने उपोषण केले. मात्र, पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आश्वासन दिले आणि नगर विकास विभागाचे नगर पालिकेला अंदाजपत्रानुसार निविदा मंजूर करण्याचे आदेश आले. त्यावर भाजपने शिवसेना उबाठा गटाच्या नेत्यांवर गंभीर टीका केली आहे.भाजपचे शहराध्यक्ष अभय इंगळे,सुनील काकडे आणि माजी नगराध्यक्ष अमित शिंदे यांनी यासंदर्भात दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,शहरातल्या डीपी रस्त्याच्या कामाच्या निविदेबाबत नगर विकास खात्याने काढलेला आदेश हा आमच्या आंदोलनाला आलेले यश असल्याचा खोटा दावा शिवसेना उबाठा गट करीत सुटला आहे, धूळफेक करण्यात ही मंडळी माहीर आहे. वास्तविक राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंदाजित दरापेक्षा अधिकच्या दराच्या निविदांना मंजुरी न देता अंदाजपत्रकात नमूद केलेल्या दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने राज्यात सगळीकडे नगरविकास विभागाची कामे करण्याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. हा आदेश केवळ धाराशिव शहरापुरता असल्याचा कांगावा करण्यात उबाठा गट धन्यता मानून आंदोलनामुळेच हे यश आल्याचा खोटा दावा करीत सुटले असून, त्यांचा दावा म्हणजे आयत्या पीठावर रेघोट्या मारण्याचा प्रकार असून आंदोलन टक्केवारीसाठी की जनतेसाठी केले लवकरच पुराव्यानिशी उघडकीस आणणार आहोत.मुळात नगरोत्थान योजनेतंर्गत असलेली ही कामे राज्यातील अन्य शहरात जवळपास पूर्ण होत आली आहेत.आमचे नेते आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी त्यांच्या मतदारसंघात धाराशिव शहर नसताना जनतेची होणारी गैरसोय टाळण्यासाठी मोठा पाठपुरावा करून या कामासाठी खास बाब निधी मंजूर करून घेतला आहे. तुम्ही मात्र यासाठी कांहीही न करता यात टक्केवारीसाठी खोडा घालण्यासाठी प्रयत्न केले.आपल्याच धाराशिव शहरातील या सर्व कामांना उशीर का झाला..? टक्केवारीसाठी यात कोणी कशा प्रकारे खोडा घातला..? जिल्ह्यात टक्केवारी वसुलीच्या विद्यापीठाचे कुलगुरू व सहकुलगुरू कोण आहेत ..? लवकरच पुराव्यानिशी सगळा लेखाजोखा जनतेसमोर आपण आणणार आहोत. त्यानंतर डोळे झाकून दूध पिणारे मांजर कोण आहे आणि कुणामुळे शहरातील सगळे रस्ते खड्ड्यात गेले आहेत, याचा सगळा दस्तऐवज खुला करणार आहोत.




### भुयारी गटार योजनेची गरज होती का, मलिदा कोणी खाल्ला ?

चांगल्या रस्त्याचे शहर म्हणून राज्यभर ओळख असलेले धाराशिव शहरातील रस्ते नावालाही शिल्लक राहिले नाहीत. टक्केवारीसाठी तुम्ही लादलेली भुयारी गटार योजना रस्त्याच्या या अवस्थेला कारणीभूत आहे. डोंगर दऱ्यावर वसलेल्या धाराशिव शहरात जरी अतिवृष्टी झाली तरी केवळ पाच मिनिटात सगळ्या पाण्याचा नैसर्गिक पद्धतीने निचरा होतो, असे असतानाही भुयारी गटार योजना का आणली..? यातून कोट्यवधी रुपयांचा मलिदा कोण हडप केला. भुयारी गटार योजनेतून कोणत्या तिघांनी स्वतःचे उखळ पांढरे करून घेतले हे पुराव्यानिशी सांगण्याची वेळ आता आली आहे. भुयारी गटारीतून कोणी-कोणी स्वतःचे हात धुवून घेतले याची देखील आम्ही सविस्तर पोलखोल करणार आहोत, असा इशारा भाजपनेदिलाआहे.

# राणा पाटील हेच संस्थापक

## शिवसेना उबाठा गटाचे भाजपला जोरदार प्रत्युत्तर, म्हणाले, तुमच्या कुल्हेकुहीने काय फरक पडणार?

आरंभ मराठी / धाराशिव

आपल्या मालकाचे १५ टक्के बुडाले याचे तीव्र दुःख झाल्याने भाजपची मंडळी आता फडफड करु लागली आहे. तुम्ही ज्या विद्यापीठाचा उल्लेख करताय त्याचे संस्थापकच आमदार राणा जगजितसिंह पाटील आहेत. फक्त टक्केवारीसाठी व आपले उखळ पांढरे करण्यासाठी राणा पाटील भाजपात गेले आहेत. दुसऱ्या बाजूला ही दोन निष्ठावंत म्हणून देशात प्रसिद्ध आहेत. तुमच्या कुल्हेकुहीने काही फरक पडणार नसल्याचा पलटवार ठाकरे सेनेचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी लगावला आहे.

भाजपाने दिलेल्या इशाऱ्यानंतर शिवसेना उबाठा गटाच्या वतीने प्रत्युत्तर देण्यात आले असून, यासंदर्भात गुरव म्हणाले की, पहिला मुद्दा ही कामे रखडली टक्केवारीसाठी अगदी बरोबर आहे. तुमचे मालक व दुसरे माजी पालकमंत्री यांच्या भांडणात ही कामे रखडली आहेत. यामुळे आमची मागणी आहे की मुख्याधिकारी यांची नार्को टेस्ट करा म्हणजे तुमच्या विद्यापीठाच्या संस्थापकाचे खरे रूप समोर येईल. ही कामे व्हावेत यासाठी सत्तेत असताना तुम्ही विरोधी मंडळीवर टक्केवारीचे कारण सांगणे हास्यास्पदच नव्हे तर मूर्खपणा म्हणावा लागेल. दुसरे म्हणजे हे अंदाजपत्रकीय दराचे धोरण मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यासाठी बनविल्याचे तुम्ही सांगताय. इतके दिवस तुम्हाला या धोरणाची माहिती नसावी कदाचित, कारण धाराशिवच्या कामाबाबत निर्णय हा दोन मेच्या पत्रात नमूद केला आहे. भुयारी गटार योजनेचे तुम्हाला एवढे वावडे होते तर भाजप देखील शिवसेनेबरोबर सत्तेत होती. तेव्हा त्याला विरोध करण्याची बुद्धी सुचली नाही काय ? शिवाय प्रत्येक पक्षाचे त्यावेळी काढलेले जाहीरनामे तपासा आणि मग योजनेबद्दल बोलावे असा टोला सोमनाथ गुरव यांनी लगावला. शहराच्या कामाना स्थगिती देणार तुमचं सरकार, कामाना आडकाठी आणणारे तुमचेच मालक, प्रत्येक पालकमंत्री यांच्याबद्दल तक्रार करणार तुमचेच नेते. मग या तक्रारी शुद्ध भावनेने करत असतील का? की यामागेही टक्केवारीचेच कारण आहे, हे जनतेला समजले आहे. त्यामुळे आपल्या मालकांना मिळणारे १५ टक्के गेलेत त्याचे एवढे दुःख व्यक्त करु नका, असा चिमटा सोमनाथ गुरव यांनी काढला आहे. तुमचे मालक फक्त विकास कामातच टक्केवारी घेत नाहीत तर उमेदवाराकडून देखील वसुली करतात याचा अनुभव तुमच्या पक्षाचे जिल्हा निरीक्षक असलेले आमदार यांनी त्यामुळे उमेदवारी नाकारली होती. त्यामुळे या जिल्ह्यात टक्केवारीची सुरवात ज्या संस्थापकांनी केली ते तुमचे मालक आहेत, असेही सोमनाथ गुरव म्हणाले. दरम्यान, शिवसेना उबाठा गट आणि भाजपमध्ये शहरातील विकासकामांवरून वाद वाढण्याची शक्यता आहे.

# बारावीच्या परीक्षेचा आज निकाल

आरंभ मराठी /मुंबई

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपद्धतीनुसार सोमवार दि. ५ मे, २०२५ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे, असे मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी जाहीर केले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे.

या संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.1 https://results.digilocker.gov.in 2) https://mahahsscboard.in 3) http://hscresult.mkcl.org 4) https://results.targetpublications.org5) https://results.navneet.com 6) https://www.tv9hindi.com/education/board-exams/maharashtra-board-exams 7) https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-hse-12-results 8) https://www.indiatoday.in/education-today/results आणि 9) https://www.aajtak.in/education/board-exam-resultsपरीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण वरील संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व माहितीची प्रत Digilocker app (प्रिंट आउट) घेता येईल. त्याचप्रमाणे मध्ये गुणपत्रिका संग्रहीत करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच https://mahahsscboard.in (in college login) या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल, अशी माहिती मंडळाच्या प्रकटनामध्ये देण्यात आली आहे.

# बिअरबारच्या मालकाचा मृतदेह आढळला, घातपात की आत्महत्या,चर्चेला उधाण

आरंभ मराठी / तुळजापूर

तालुक्यातील इटकळ येथील प्रथम बिअर बारचे मालक श्रीशैल नंदर्गी (४७) यांचा मृतदेह बाभळगाव येथील तलावात आढळून आला असून, त्यांची आत्महत्या आहे,की घातपात याविषयी संशय व्यक्त केला जात आहे.परिसरात चर्चेला उधाण आले असून,पोलिसांनी तपास सुरू केला आहे. इटकळ येथील प्रथम बारचे मालक श्रीशैल नंदर्गी हे शनिवारी रात्री ११ पासून बेपत्ता होते. रविवारी सकाळी सात वाजता बाभळगाव येथील तलावा जवळ त्यांची चार चाकी गाडी लोकांना दिसली. त्यामुळे संशय बळावल्याने शोध घेतला असता त्यांचा मृतदेह बाभळगाव येथील तलावात आढळून आला. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी दोन मुले एक मुलगी असा परिवार आहे. दरम्यान पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले व मृतदेह तलावातून काढून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. त्यांच्यावर रविवारी ईटकळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. नंदर्गी हे हसतमुख व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते. त्यांच्या



निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत.

# कोथंबीरे यांना सेवारत्न पुरस्कार

आरंभ मराठी /उमरगा

उमरगा येथील सामाजिक कार्यकर्ते सुमीत कोथिंबीरे यांना राज्यातील प्रतिष्ठीत गणला जाणारा शांतीदूत परिवाराचा राज्यस्तरीय '' सेवा रत्न'' पुरस्कार नुकताच उमरगा येथे प्रदान करण्यात आला. प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, मुंबई ही संस्था गेले ३० वर्षापासून देश पातळीवर शैक्षणिक, विषमुक्त शेती, बेरोजगार मुक्त भारत, डिजीटल शिक्षण, व्यवसायीक शिक्षण या विषयावर काम करीत आहे.

# शांतिदूत परिवाराच्या सेवारत्न पुरस्कार सोहळ्यात समाजसेवकांचा प्रेरणादायी गौरव

आरंभ मराठी/ उमरगा

समाजात विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव म्हणजे त्यांच्या सेवाभावाला दिलेली दाद असून, अशा गौरवामुळे त्यांच्या कार्याला नवे बळ मिळते, असे मत अमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी व्यक्त केले. शांतिदूत परिवार महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित सेवारत्न पुरस्कार २०२५ चे वितरण उमरगा येथील ओम लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी शांतिदूत परिवाराच्या अध्यक्षा विद्याताई जाधव अध्यक्षस्थानी होत्या. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात समाजहितासाठी झटणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, शिवसेना उपनेत्या सौ. अस्मिता गायकवाड (सोलापूर), तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी आमदार प्रवीण स्वामी, अस्मिता गायकवाड यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी, सूत्रसंचालन ॲड. एस.पी. इनामदार यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. युसुफ मुल्ला यांनी केले.पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले, अमर सुर्यवंशी, अनिल सगर, महंमद रफिक शेख यांची भाषणे यावेळी झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जीवन जाधव, पद्माकर मोरे, मनेश माणिकवार, संतोष जाधव, श्याम पाटील, जितेंद्र घोटाळे, मधू चौधरी (पुणे), नसीरुद्दीन शेख आदींचे मोलाचे सहकार्य लाभले.

**गौरवण्यात आलेले मान्यवर:**

मोहियोदिन सुलतान (माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती)
विजय दळगडे (माजी नगरसेवक)
डॉ. तुकाराम मोटे (सह संचालक, कृषी विभाग)
अमर सूर्यवंशी (सरपंच, जकेकुरवाडी)
उद्योजक अनिल सगर, सुमित कोथिंबीरे
पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले
मंजुषा चव्हाण, ॲड. दिलीप सगर
शितल रासकर (शाखा प्रबंधक, एसबीआय)
अपर्णा पोद्दार, संजय रूपाजी
सुरेश माणिकवार, अशोक जाधव, किसन राठोड
अजय गायकवाड, शेखर आंबेकर
गोविंदराव गायकवाड



# कळंब येथे क्रीडा विभागाच्या वतीने मोफत उन्हाळी आट्यापाट्या प्रशिक्षण

आरंभ मराठी/ कळंब

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, आट्यापाट्या मंडळ धाराशिव कै. महादेव गव्हार बहुउद्देशीय व्यायामशाळा व क्रीडा मंडळ येडशी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत उन्हाळी आट्यापाट्या क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.प्रशिक्षण सदरील मोफत आट्यापाट्या प्रशिक्षण १ मे ते १ जून या कालावधीत कळंब तालुक्यातील कोथळा जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगणगाव,तालुका क्रीडा संकुल कळंब येथे स . ०६:०० ते० ८ : ०० व सायंकाळी ४.०० ते ६.३० या वेळेत होणार आहे . परिसरातील सर्व शालेय मुला मुलींनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा आट्यापाट्या मंडळ यांच्या वतीने करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी मुख्य प्रशिक्षक दिपक शिंदे ८२७५२७२७८७ किंवा ७७९८०६८८६४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# परिवहन मंत्र्यांकडे मागणी करताच मुंबई बस सेवा सुरु

## कळंब तालुक्यातील मोहा,दहिफळ ग्रामस्थांच्या मागणीला जलद प्रतिसाद

आरंभ मराठी । मोहा

कळंब येथून मोहा, वाघोली, दहिफळ मार्गे थेट बोरिवलीला (मुंबई) बस सेवा अखेर सुरू झाली असून, या सेवेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मोहा व दहिफळ येथील ग्रामस्थांनी ही सेवा सुरू करण्याची सामूहिक मागणी नुकतीच १ मे रोजी राज्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे केली होती. विशेष म्हणजे, पालकमंत्र्यांनी या मागणीची तात्काळ दखल घेत केवळ एका दिवसात २ मे रोजी ही बस सेवा सुरू करण्याचे आदेश दिले. ही एस.टी. बस दररोज सकाळी ६:३० वाजता कळंब येथून सुटणार असून, मोहा येथे सकाळी ७ वाजता पोहोचेल. तर बोरिवली येथून सकाळी ५:३० वाजता गाडी निघणार आहे. या नव्या सेवेमुळे परिसरातील प्रवाशांना थेट मुंबईला जाण्यासाठी आता मोठा दिलासा मिळणार आहे. यापूर्वी प्रवाशांना मुंबईसाठी लांबच्या प्रवासात खाजगी वाहतुकीवर किंवा इतर मार्गांवर अवलंबून राहावे लागत होते. मोहा येथे या नव्या बसचे आगमन झाल्यावर ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने स्वागत करून बसचे चालक व वाहक यांचा सत्कार केला. स्वागत समारंभात विविध सोसायट्यांचे चेअरमन गौतमराव मडके, उपसरपंच बशारत मोमीन, ग्रामपंचायत सदस्य संजय मडके, शिक्षक संजय मडके व सतीश मडके यांनी उपस्थित राहून बससेवेचे स्वागत केले. या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी पालकमंत्र्यांचे विशेष आभार मानले व ही सेवा सातत्याने सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच भविष्यातही ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सोयीसाठी अशा अधिक सेवा सुरू कराव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.




# धनेश्वरी शिक्षण समूहाची आता साखर कारखानदारीतही एन्ट्री





आरंभ मराठी/ धाराशिव

परभणी तालुक्यातील तालुक्यातील आमडापूर येथील श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्सचे नवे भागीदार म्हणून आ.डॉ राहुल पाटील व धनेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांचा समावेश झाला असल्याची माहिती शुगर्स प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.या भागीदारीमुळे साखर कारखानदारीत पाटील कुटुंबीयांनी पाऊल टाकल्याने श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्सचे ज्येष्ठ मार्गदर्शक ॲड. न.चि.जाधव यांनी स्वागत केले. आतापर्यंत कारखाना शेतकरी आणि कामगार कर्मचाऱ्यांच्या हिताचे धोरण राबवित आहे. आ.डॉ. पाटील यांच्या सहभागाने या प्रयत्नांना अधिक बळकटी येईल. येत्या गळीत हंगामापासून कारखाना पूर्ण क्षमतेने चालविण्याच्या दृष्टीने एकत्र बैठक घेवून पुढील निर्णय घेण्यात येणार आहेत. श्री लक्ष्मी नृसिंह शुगर्सचे भागीदार म्हणून कारखान्यात सहभागी झाल्याबद्दल आ.डॉ. पाटील यांचे स्वागत ॲड.न.चि. जाधव, प्रमोद जाधव यांनी स्वागत केले..

# दुनिया में कितना ग़म है,मेरा ग़म कितना कम है...

१ मे रोजी सोलापूर शहरात सावित्री महिला संघटनेच्या वतीने 'बुक क्लब' या अनोख्या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. वाचनप्रेमींनी दर पंधरा दिवसांनी एकत्र येऊन वाचलेल्या पुस्तकावर आपले विचार मांडावेत, हा या क्लबचा मुख्य उद्देश आहे.

या क्लबाची संकल्पना इतिहास संशोधक सरफराज अहमद यांची असून, सोलापूर येथील सरिता मोकाशी आणि कॉ. रवींद्र मोकाशी या दांपत्याच्या प्रोत्साहनातून या उपक्रमाचा आरंभ झाला. बुक क्लबचे उद्घाटन ख्यातनाम लेखक समीर गायकवाड यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात उपस्थित राहून मला महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे महत्त्व सांगण्याची संधी मिळाली.

या कार्यक्रमात समीर गायकवाड यांनी त्यांच्या बहुचर्चित पुस्तक 'रेड लाइट डायरीज... खुलूस' यावर आपले विचार मांडले. रेड लाइट एरिया आणि तेथील महिलांच्या दर्दभऱ्या कहाण्या त्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन लिहिल्या आहेत. त्यांच्या बोलण्यातून, ''या स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहिलं पाहिजे,'' ही तळमळ प्रकर्षाने जाणवली. एकेक कहाणी जेव्हा ते सांगू लागले, तेव्हा आम्ही सारे स्तब्ध झालो. रेड लाइट एरियामध्ये काय चालते, याची अंधुक कल्पना आपल्याला सिनेमांतून येते. पण या महिलांच्या आयुष्याची खऱ्या अर्थाने जाणीव होत नाही. त्या कोणत्या परिस्थितीत या व्यवसायात येतात? त्या सुखात असतात का? इतर व्यवसायांप्रमाणे हा व्यवसाय अधिकृत आहे का? पोलीस, शासन आणि समाज यांची भूमिका काय असते? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्या बोलण्यातून मिळत गेली. ''पुरुषाच्या वासनेचे शमन होते, म्हणून हा व्यवसाय आवश्यक आहे,'' असे हिनकस विचार आजही काही उच्चशिक्षित लोक बाळगतात, हे ऐकून धक्का बसला. ''कुंटणखाना'' हेच घर, आणि तेथील बायका, मालकीण, दलाल, गिऱ्हाईक हेच नातेवाईक मानून त्या महिला नाईलाजाने जगत असतात. त्या एकमेकींना बहिण, आई, सखी म्हणून भावनिक आधार देतात. या स्त्रियांच्या वाट्याला आलेले आयुष्य, त्यांचा त्रास, त्यांचे दुःख शब्दांपलीकडचे आहे.

''शरीरविक्रय करणाऱ्या'' या बायकांना ''बाजारबसव्या'' म्हणत हेटाळणी केली जाते, पण त्यांना बाजारात बसायला भाग पाडणारा समाजच आहे, ही कटू सत्यता समोर आले. बालपणीच काहीजणींना त्यांच्या नातेवाईकांनी विकले गेले होते. काहींना मित्राने, नवऱ्याने फसवले होते. काहींवर घरच्या पुरुषांनीच अत्याचार करून त्यांना घराबाहेर काढले. त्यांचे अनुभव म्हणजे केवळ शारीरिक अत्याचार नाहीत, तर आर्थिक फसवणूक, समाजापासून तुटलेपण, व्यसनाधीनता आणि न ठरलेलं मृत्यू... हे सगळं ऐकल्यावर आमचं डोकं सुन्न झालं.



किशोर जाधव, सोलापूर
मो. नं ९९२२८८२५४१

''दुनिया में कितना ग़म है,
मेरा ग़म कितना कम है,
लोगों का ग़म देखा तो,
मैं अपना ग़म भूल गया...''

हे 'अमृत' सिनेमातील गीत डोक्यात वाजू लागले.एवढं दुःख सहन करणाऱ्या या महिलांच्या वेदनांची कल्पनाही सामान्य समाजाला नसते. आणि ज्यांना असते, ते फक्त कोरड्या संवेदना व्यक्त करत राहतात. काहीजण हेटाळणीने, तर काहीजण विकृत नजरेने त्यांच्याकडे पाहतात. समाजातील वेश्या, तृतीयपंथी, दिव्यांग, दीर्घ आजारग्रस्त, गुन्हा न करता तुरुंगात टाकले गेलेले कैदी, बालमजूर, वेठबिगार हे सर्व घटक असह्य यातना भोगत असतात. त्यांपैकी काहींचं जगणं इतकं कठीण असतं की ''मरण येत नाही म्हणून जगतो'' अशी त्यांची भावना असते. अपघातात एक पाय गेलेला, दोन्ही पाय गेलेल्या व्यक्तीकडे पाहून स्वतः ला सुखी मानून जगत असतो. तर हात नसलेले आपले पाय सक्षम आहेत यामध्ये स्वतःला सुखी मानतो. सर्व शरीर धडधाकट आहे, पण परिस्थिती, समाज आणि नीती याच्या फेऱ्यात अडकून अनेक जण नरक यातना सोसत असतात . प्रचंड कष्ट उपसून देखील दोन वेळेची रोजी रोटी मिळवणं काहींना मुश्किल असतं. पंख्याखाली बसून वैतागणाऱ्या लोकांनी बांधकाम मजुरांचे दुःख कधी समजून घेतले का? शॉवरखाली अंघोळ करणाऱ्यांना दोन किलोमीटर चालून एक हंडा पाणी आणणाऱ्यांची कल्पना आहे का? पंचतारांकित हॉटेलमध्ये बुफे डिनर घेताना उपाशी पोटी झोपणाऱ्या बालकांची आठवण येते का?

''सबके दिल में शोले हैं,
सबकी आँख में पानी है,
जिसको देखो उसके पास,
एक दुःख भरी कहानी है...''

अशा दुःखद कहाण्या समोर आणणारे आणि त्या महिलांसाठी कार्य करणारे लेखक समीर गायकवाड यांना मन:पूर्वक सलाम आणि आभार!

# भूमिपुत्रांना साद!

आपल्या मायेची ऊब हवी आहे! -धाराशिवच्या निरागस लेकरांना तुमची प्रतीक्षा!माझ्या धाराशिव जिल्ह्यातील प्रिय बंधू आणि भगिनींनो, तुम्ही नोकरी-व्यवसायासाठी शहरांमध्ये स्थायिक झाला असलात,तरी तुमच्या मनात आपल्या जन्मभूमीची ओढ कायम आहे,हे मला ठाऊक आहे!आता लवकरच तुम्ही आपल्या गावी,धाराशिवला सुट्टीसाठी येणार आहात. या सुट्टीत,मी तुम्हाला एका अशा ठिकाणी भेट देण्याची कळकळीची विनंती करतो,जिथे तुमच्या प्रेमाची आणि आधाराची नितांत गरज आहे.हे ठिकाण आहे- सह्याद्री अंकुर शिशुगृह (विशेष दत्तक संस्था)या संस्थेत ०ते६ वर्ष वयोगटातील काही निरागस बालकं आहेत,ज्यांच्या नशिबी आई-वडिलांचं छत्र नाही. कुमारी मातांनी किंवा नकोसे झालेले नाईलाजाने सोडलेले हे निष्पाप जीव तुमच्या भेटीची आतुरतेने वाट पाहत आहेत.तुमच्या केवळ एका भेटीने त्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलू शकते,त्यांच्या मनात आशेची किरणं निर्माण होऊ शकतात.तुमचा आशीर्वाद आणि स्नेह त्यांच्यासाठी खूप मोलाचा आहे.आणि हो!ज्यांच्या मनात कुटुंबाचा विस्तार करण्याची इच्छा आहे,त्यांच्यासाठी दत्तक पालकत्वाचे स्वप्न साकार करण्याची संधी देखील येथे आहे.सह्याद्री अंकुर शिशुगृह हे दत्तक विधान कायद्यानुसार नोंदणीकृत असून,संस्थेमार्फत नियमानुसार इच्छुक पालकांना बाळं दत्तक दिली जातात.माझ्या दानशूर आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या धाराशिवकरांनो,ही संस्था तुमच्या आणि समाजातील उदार व्यक्तींच्या मदतीनेच कार्यरत आहे.तुमच्या मदतीचा छोटासा हातभार या निराधार बालकांना एक उज्वल भविष्य देऊ शकतो.या सुट्टीत थोडा वेळ काढून सह्याद्री अंकुर शिशुगृहाला नक्की भेट द्या आणि या निष्पाप चेहऱ्यांवरील आनंद अनुभवा!



डॉ.दिग्गज दापके-देशमुख
सह्याद्री अंकुर शिशुगृह.

सह्याद्री अंकुर शिशुगृह
(विशेष दत्तक संस्था)
छत्रपती संभाजी राजे मार्ग, (डी.आय.सी.रोड),काकडे प्लॉट, धाराशिव.
संपर्क:९८९०३४३९९२ / ९२७०११७७०६
चला तर मग,या सुट्टीत आपल्या मायेची ऊब देऊया,या निरागस जीवांना!

# नारंगवाडी केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात


आरंभ मराठी / नारंगवाडी



उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पेठसांगवी येथे नारंगवाडी केंद्राची शिक्षण परिषद मंगळवारी उत्साहात संपन्न झाली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष पाटील, उपाध्यक्ष उमेश सुरवसे, सदस्य निळकंठ राठोड, केंद्राचे केंद्रप्रमुख अशोक सुतार पाटील, केंद्रिय मुख्याध्यापक माधव कांबळे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना गुंजोटे व केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सर्व मान्यवरांचा पुष्पहार घालून शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. केंद्रप्रमुख अशोक सुतार पाटील यांनी प्रास्तविक सादर केले. निपूण भारत व इतर प्रशासकीय बाबीवर रमेश बालवाड यांनी मार्गदर्शन केले. केंद्रातील बोरी या शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक हुडगे यांचा केंद्राच्या वतीने सपत्नीक भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त केंद्रातील राघू खटके व श्रीमती ज्ञानेश्वरी गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवमुर्ती स्वामी व आभार इब्राहिम चौधरी यांनी मानले.

# पवित्र नाते गुरू आणि शिष्याचे...

मानवी जीवनात रक्ताची नाते, रक्ताच्या नाते संबंधातून निर्माण झालेली नाते व मानलेली नाते यांना फार महत्त्व आहे.जगात वेगवेगळ्या नात्यांची वीण घट्ट विणली गेली आहे.माणूस या नात्याने आपण आपले नाते संबंध जीवापाड जपण्याचा प्रयत्न करतो. सुखदुःखात एकत्र येऊन सगळे नातेवाईक आपापल्या नात्याला दृढ करण्याचा व प्रामाणिकपणे नाते जपण्याचा प्रयत्न करत असतात.परंतु,या दुनियेत गुरू आणि शिष्य यांचे नाते खास आणि निर्मळ भावनेने ओतप्रोत भरलेले असते.गुरू शिष्याच्या नात्याचे पावित्र्य हे अलौकिक आणि चमकदार असते.फार फार वर्षांपूर्वी पासून गुरू शिष्याच्या नात्याला जपण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला आहे.फक्त एकलव्याच्या वाट्याला गुरुदक्षिणेचा अतिशय वाईट आणि अमानुष अनुभव अनुभवायला मिळाला.ही कटुता सोडली तर गुरू शिष्याच्या नात्याचे पावित्र्य,मोठेपण व निस्वार्थपणा अबाधित राहिला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तथागत गौतम बुद्ध,संत कबीर आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरू मानले होते. त्यांनी प्रत्यक्षात त्यांच्याकडून कधी शिक्षण घेतले नाही,कधी प्रत्यक्षात त्यांची भेट झाली नाही तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्या तीन महापुरुषांना आपले गूरू मानतात आणि त्यांच्या विचारांनी,कार्यांनी प्रभावित होतात ही साधी गोष्ट नव्हती.पुढे चालून त्या तीन गुरूंना नेहमी आदर्श स्थानी ठेवून बाबासाहेबांनी सामाजिक,



शैक्षणिक,राजकीय,धार्मिक, आर्थिक,कृषी,कामगार आणि सर्व व्यापक क्षेत्रात जे भरीव कार्य केले आहे त्याला तोड नाही.त्यांनी तथागत गौतम बुद्धांचा विज्ञानवादी व मानवतावादी बौद्ध धर्माचा स्वीकार केला,महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार संविधानाच्या माध्यमातून तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवले,आणि संत कबीरांचे दोहे साहित्याच्या माध्यमातून व सामाजिक क्रांती करून सामाजिक परिवर्तन घडवून आणले.म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे तीन गुरु यांचे नाते हे खास आणि जगावेगळे होते. राजमाता जिजाऊ ह्या रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आई होत्या परंतु त्यांच्यातील गुरू शिष्याचे नाते शेवटपर्यंत अबाधित राहिले.हे नाते ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय लक्षणीय व प्रेरणादायी राहिले. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे दोघे पती पत्नी होते पण नंतर ते एकमेकांचे गुरू शिष्य झाले.ह्या दोघांनी मिळून भारतात सामाजिक क्रांतीचा पाया घातला.शिक्षण व सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी जे भरीव सामाजिक कार्य केले त्याला तोड नव्हती हे कोणालाही मान्य करावे लागेल.साने गुरुजी यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना श्यामची आई या पुस्तकातून वेळोवेळी अमुल्य मार्गदर्शन केले आहे आणि गुरू शिष्याच्या नात्याला जीवापाड जपले आहे.

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

आई आणि वडील हे कोणत्याही व्यक्तीचे पहिले गुरू असतात परंतु पुरुषाच्या जीवनात पत्नीची एंट्री झाली की आईवडिलांच्या नात्याला म्हणावे तेवढे महत्त्व दिले जात नाही.आई वडिलांच्या नंतर अंगणवाडी ताई, पहिल्या वर्गाचे वर्गशिक्षक, प्राथमिक वर्गाचे शिक्षक, माध्यमिक शिक्षक आणि कॉलेजचे प्राध्यापक ह्या सगळ्या गुरूंना आपण नेहमी वंदनीय मानतो. त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन आपण नेहमी वंदनीय मानतो. म्हणून त्यांचे व आपले गुरू शिष्याचे नाते आपण शेवटपर्यंत टिकवण्यासाठी धडपडत असतो. मला ज्या ज्या शिक्षकांनी शालेय जीवनाचे धडे दिले,माझी आजी, माझी आई,माझे वडील आणि माझ्या भाऊ बहिणींनी मला जीवनात योग्य वेळी योग्य सल्ले दिले त्याबद्दल माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली.मी नेहमी माझ्या गुरूंना वंदनीय मानतो. शिक्षक या नात्याने मी माझे व माझ्या सर्व विद्यार्थ्यां सोबत असलेल्या नात्याला नेहमी पवित्र नाते मानतो.मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांना योग्यवेळी योग्य मार्गदर्शन करणे माझे कर्तव्य समजतो. गुरू शिष्याच्या पवित्र नात्याला कलंकित करणाऱ्या काही घटना घडत असतात. गुरू पदाची जबाबदारी पेलवत नसेल आणि गुरू शिष्याच्या नात्याचे पावित्र्य जपणे कठीण जात असेल तर त्या दुष्ट व्यक्तींनी शिक्षकांची नोकरी स्विकारू नये असा प्रामाणिक सल्ला द्यावा वाटतो. गुरू शिष्याच्या नात्याचे पावित्र्य जपणे आपल्या सर्वांचे परमकर्तव्य आहे हे नेहमी लक्षात ठेवावे.

# इतिहासाचे प्राध्यापक डॉ.सतीश कदम यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान

आरंभ मराठी / तुळजापूर

तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ सतीश कदम सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हासदादा बोरगावकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, उपप्राचार्य डॉ. नरसिंग जाधव, माजी प्राचार्य डॉ. जे .एस. मोहिते, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य रमेश नन्नवरे, आबासाहेब कदम, सुरज कदम, माजी नगरसेवक राजेश शिंदे, माजी नगरसेवक नागनाथ भांजी यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या वतीने प्रा रमेश नन्नवरे यांनी प्रास्ताविक भाषण केले. या निमित्ताने नागनाथ भांजी, प्रा.शिवाजी शिंदे, प्रा संभाजी भोसले, सुरज कदम, प्रा. डी.जी जाधव, माजी प्राचार्य जे एस मोहिते आदींनी डॉ सतीश कदम यांचे शैक्षणिक काम आणि इतिहास संशोधनाचे कार्य याविषयी गौरवपर भाषणे केली. कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड यांच्या भाषणाने झाला. सत्कारमूर्ती डॉ. सतीश



कदम यांनी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने संशोधन कार्यामध्ये मला मोठे सहकार्य केले, त्यामुळेच आपण महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांमध्ये संशोधन कामासाठी फिरू शकलो आणि इतिहासाचे संशोधन करत असताना विविध ठिकाणी व्याख्याने देऊन जनजागृती करू शकलो अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी जेटीथोर यांनी आणि आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ .नरसिंग जाधव यांनी केले. यावेळी विविध महाविद्यालयाचे प्राध्यापक, कदम परिवाराचे हितचिंतक नातेवाईक, इतिहास संशोधनामध्ये कार्य करणारे संशोधक आणि विद्यार्थी या समारंभासाठी उपस्थित होते.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याची चौकशी करण्याची सद्भावना मंचची मागणी

आरंभ मराठी / धाराशिव

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ सद्भावना मंचच्या वतीने प्रधानमंत्री यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. यात म्हटले की,पहलगाम मधील झालेल्या पर्यटकावरील हल्ल्याच्या आम्ही निषेध करतो. या हल्ल्यात निर्दोष २८ पर्यटकांचा जीव गेला याचे आम्हाला दुःख आहे.यात कोणत्याही प्रकारची सुरक्षा नसुन एकही पोलीस तिथे नव्हते. आपल्या बेपर्वा व बेजबाबदार सरकारमुळे हे झाले. कलम ३७० हटविल्याने काश्मीर सुरक्षित आहे व पर्यटकांना येथे येण्यासाठी आवाहन केले. परंतु, पहलगाम मधील हल्ल्याने परत एकदा सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला. काश्मिर मध्ये गेल्या दहा वर्षांत मोठमोठे अतिरेकी हल्ले झाले. पुलवामा, उरी,आणि सध्याचा पुलवामा या सर्व घटनेची चौकशी सुप्रीम कोर्टातील सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली करावी. सीआरपीएफ, एसआरपीएफ व स्थानिक पोलीस यंत्रणा येथील पर्यटन स्थळांवर कायम तैनात केली पाहिजे. अशा प्रकारचे लेखी निवेदन धाराशिव सद्भावना मंचच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते देण्यात आले.यावेळी शाजुद्दीन शेख, धर्मवीर कदम, अब्दुल लतिफ, गणेश वाघमारे, सिकंदर पटेल, दादासाहेब जेटीथोर, विजय गायकवाड, हाजगुडे उपस्थित होते.




# श्रीपतराव भोसले हायस्कूलला निलंगा येथील महाराष्ट्र विद्यालयाची सदिच्छा भेट

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहरातील श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला निलंगा येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या पथकाने सदिच्छा भेट दिली. या पथकामध्ये मुख्याध्यापक एम. आर. नटवे, सहशिक्षक एस. ए. कांबळे, बी. एम. सोनवणे, आर. ए. बिराजदार, जी. एस.भोपी आदींचा समावेश होता. यावेळी मुख्याध्यापक एम.आर. नटवे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून श्रीपतराव भोसले हायस्कूलचा महाराष्ट्रभर असलेला नावलौकिक तसेच विद्यालयांमध्ये चालणारे नवनवीन शैक्षणिक उपक्रम याची माहिती घेतली. जेईई व एनईईटी (नीट) साठी चालणारे फिजिक्स वालाचे वर्ग, प्रशस्त वर्गखोल्या, डिजिटल वर्गखोल्या, विद्यालयाची शिस्त, शिक्षक-विद्यार्थी यांची शिस्त व गणवेश, सर्व सोयींनी सज्ज असलेली शालेय इमारत, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, सीसीटीव्ही इत्यादी गोष्टींचे त्यांनी कौतुक केले. या प्रसंगी प्राचार्य एन. आर. नन्नवरे यांनी विद्यालयाची गुणवत्ता, प्रशासन व कामकाज, आतापर्यंत घडविलेले विद्यार्थी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी केलेले खेळाडू व त्यांना मिळालेले पुरस्कार तसेच क्रीडा शिक्षकांना मिळालेले पुरस्कार याविषयी माहिती सांगितली.यावेळी उपप्राचार्य एस. के. घार्गे, पर्यवेक्षक एम. व्ही. शिंदे , स्कॉलरशिप विभाग प्रमुख कुमार निकम, पर्यवेक्षक डी. ए. देशमुख, पर्यवेक्षक निखिल गोरे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी देखील उपस्थित होते.



# शारदा विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये १९९३-९४ च्या १० वीच्या बॅचचा स्नेहमेळावा

आरंभ मराठी/ धाराशिव

तालुक्यातील सारोळा येथील शारदा विद्यानिकेतन हायस्कूल येथे इयत्ता १० वीच्या १९९३-९४ बॅचचा स्नेहमेळावा तब्बल ३१ वर्षांनंतर उत्साहात व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून प्रशालेचे माजी मुख्याध्यापक भागवत रणदिवे उपस्थित होते. सर्वप्रथम बॅचच्या वतीने शाळेसाठी बांधण्यात आलेल्या कमानीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर व्यासपीठावर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष सुरेशभाऊ देवगिरे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास दहावीच्या बॅचचे सर्व माजी शिक्षक व गुरुजन एस.के. भोसले सर, एम.डी. जाधव सर, एम.बी. साठे सर, आर.के. कदम सर, तसेच सेवक दामाजी बोरकर व नारायण शितोळे यांचे स्वागत शाल, श्रीफळ व विठ्ठलमूर्ती देऊन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना संचालक व बॅचचे माजी विद्यार्थी जयंत बाकले यांनी केली.''लहान होऊया आणि शाळा शिकूया'' या भावनेने पुन्हा एकदा एकत्र आलेल्या मित्रांनी आपले मनोगत व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. प्रशांत रणदिवे, धनंजय कोल्हे, नामदेव खरे, बसवेश्वर देवगिरे, दिनकर देवगिरे आदी मित्रांनी अनुभव कथन करत उपस्थितांना भावविवश केले.या कार्यक्रमात विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुलींची उपस्थिती, ज्या आजही विविध जबाबदाऱ्या सांभाळून सुद्धा आवर्जून उपस्थित होत्या. रूपाली पाटील, बानूबी मुजावर, रेखा मेटे, कालींदा वाघमारे, कमल चंदने, गंगाबाई जाधव, मुक्ता पवार, गंगुबाई रणदिवे आणि कल्पना हाजगुडे यांना समई भेट देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात माजी सचिव सोपान कोल्हे यांनी संस्थेच्या वाटचालीबाबत माहिती दिली. शिक्षक गुरुजनांनी बॅचचे कौतुक करत शैक्षणिक प्रवास आणि बदलावर मार्गदर्शन केले.मुख्याध्यापक मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या सागर घायतिडक आणि पार्थ जाधव यांचा सत्कार राजेंद्र कासार व दत्तात्रय जासूद यांच्या हस्ते करण्यात आला.सूत्रसंचालन पांडुरंग घोडके



यांनी केले.या गेट-टुगेदरला माजी विद्यार्थी ४७ पैकी ४१ जण उपस्थित होते. संचालक रमेश रणदिवे, सावन देवगिरे, नंदकुमार चंदने आणि सध्याचे शिक्षकवृंद डीकुळे सर, पडवळ सर, पिसे सर, बारटक्के सर, रायजादे सर, पाटील मॅडम, मगर मॅडम, चिलवाड मॅडम, दूधंबे मामा यांचा सन्मान करण्यात आला.

# यशदा मल्टीस्टेट येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

आरंभ मराठी/ धाराशिव

येथील यशदा मल्टीस्टेटच्या वतीने महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.महाराष्ट्र दिनानिमीत्त ध्वजवंदन करून राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी आपले विचार मांडले.यशदा मल्टीस्टेटचे संस्थापक प्रा.सुधीर सस्ते यांच्यासह कर्ज वितरण अधिकारी सचिन लोमटे, बँकेचे कार्यकारी अधिकारी प्रकाश गरड, रितापुरे, पंकज भिसे, ठेव विभाग प्रमुख मुख्य शाखा प्रमुख नितीन जाधव आणि सर्व यशदा परिवार उपस्थित होता. सदरील कार्यक्रमामध्ये सचिन लोमटे यांनी महाराष्ट्र दिनाविषयीची महती व्यक्त केली तर अध्यक्षीय समारोपामध्ये सुधीर सस्ते यांनी महाराष्ट्राची संस्कृती, निती, निसर्ग आणि विकासाचे धोरण याविषयी गौरवोद्गार काढले. सूरज बारबोले यांनीआभारमानले.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

## विविध वृत्त...

## अग्निशमन दिनानिमित्त तुळजापूरमध्ये वाहनांची पूजा




आरंभ मराठी / तुळरापूर

तुळजापूर- राष्ट्रीय अग्निशमन दिवसाचे औचित्य साधून नगर परिषद तुळजापूरच्या अग्निशमन दलातील वाहनांची पूजा करण्यात आली. यानंतर अग्नीशामक दलाचे कर्मचारी देविदास देवकते, मेघराज सिद्धगणेश, हर्षद क्षीरसागर, अजयरत्न सोनवणे, संजय बनसोडे, महावीर सुरते या कर्मचारी बांधवाचा सत्कार करण्यात आला यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, पंडितराव जगदाळे, विजय कंदले,नरेश अमृतराव, भाजप तालुकाध्यक्ष आनंद कंदले,लखन पेंदे, रत्नदीप भोसले व सहकारी उपस्थित होते.

## भगवान देवकते यांची शिवसेना जिल्हा सह संपर्कप्रमुखपदी नियुक्ती



आरंभ मराठी / धाराशिव

बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्ववादी विचार आणि शिवसेनेची लढवय्यी परंपरा जपत, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार भगवान देवकते यांची धाराशिव जिल्ह्याच्या शिवसेना सह-संपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भगवान देवकते हे कर्तव्यदक्ष आणि पक्षनिष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. ठाणे भागातील कट्टर शिवसैनिक म्हणून त्यांची ओळख असली तरी, त्यांचे मूळ गाव उमरगा तालुक्यात असून ते धाराशिव जिल्ह्याशी नातं जपणारे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या कार्यतत्परतेतून जिल्ह्यातील जनसंपर्क अधिक बळकट होईल, असा विश्वास पक्षश्रेष्ठींनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीबद्दल भगवान देवकते यांचे धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्यासह अनेक शिवसेना नेत्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## ३१ व्या आखिल भारतीय नवोदित मराठी संमेलनात तुकाराम गंगावणे यांची निवड

आरंभ मराठी / परंडा

कराड जि. सातारा येथे होत असलेल्या ३१ व्या आखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात परंडा येथील जेष्ठ साहित्यिक तुकाराम गंगावणे यांची निमंत्रीतात निवड झाली आहे . या संमेलनाचे उद्घाटक राष्ट्रवादी पक्षाध्यक्ष शरद पवार असून अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक प्रविण गायकवाड , स्वागताध्यक्ष सिक्कीम चे माजीराज्यपाल श्रीनिवास पाटील , तर खासदार उदयनराजे भोसले ,व पृथ्वीराज चव्हाण , जयंत पाटील , कराडचे आमदार डॉ . अतुलबाबा भोसले प्रमूख अतिथी असणार आहेत . सदरील संमेलनाचे प्रमुख निमंत्रक डॉ . शरद गोरे यांनी परिश्रम घेतले आहे . दि .९ व १० मे रोजी दोन दिवस आखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन मोठ्या दिमाखात पार पडणार असून परंड्यातील साहित्यिक तुकाराम गंगावणे गडंगणकार हे निमंत्रिक कवि राहणार असल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .



## पळसप तलाठी कार्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



आरंभ मराठी / पळसप

पळसप येथे कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त तलाठी कार्यालय या ठिकाणी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून येथील सज्जाचे तलाठी राजाभाऊ आडगळे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्रशालेचे शिक्षक भास्कर खडबडे, कालिदास झिने, संदीप लाकाळ, बार्टीचे समतादूत रमेश नरवडे, युवा कार्य प्रशिक्षणार्थी अक्षय सरडे तसेच कोतवाल अमोल शिखरे, गावातील रमेश सरडे , बालाजी सरडे सह प्रशालेचे विद्यार्थी उपस्थित होते.

### महाबळेश्वर येथे आयोजित महापर्यटन उत्सव२०२५ चा शानदार समारोप

# पर्यटनाला चालना देण्यासाठी वर्षभराचे कॅलेंडर तयार करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

आरंभ मराठी /सातारा

**सातारा पर्यटन विकासासाठी पर्यटन विभागाने वर्षभरातील पर्यटनाचे वेळापत्रक तयार करून त्यात राज्याच्या विविध भागात वर्षभरात आयोजित उत्सव - सोहळ्यांचा समावेश करावा. यासोबतच देशातील टूर ऑपरेटर्स सोबत कार्यशाळा घेऊन त्यांना इथल्या पर्यटन सुविधांची माहिती द्यावी. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकाच पोर्टलवर सर्व पर्यटन सुविधांची माहिती सर्वांसाठी उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**




महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ द्वारा महाबळेश्वर येथे आयोजित 'महापर्यटन उत्सव-२०२५' चा शानदार समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील),आ. डॉ.अतुल भोसले, आ. सचिन पाटील, आदी उपस्थित होते.पर्यटन महोत्सवला उत्तम प्रतिसाद मिळाल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पर्यटन वाढीसाठी नागरी सुविधा आणि पर्यटन संस्कृती विकसित करणे गरजेचे आहे. पर्यटन संस्कृती विकसित करून स्थानिकांचे सहकार्य पर्यटकांना सुखद अनुभव येण्यासाठी महत्वाचे आहे. शौर्य आणि निसर्ग सौंदर्याचा सुंदर मिलाफ महाबळेश्वर येथे पाहायला मिळतो. निसर्गाने सुंदर पश्चिम घाट आपल्याला दिला आहे, ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा दिला आहे, अनेक सुंदर, पवित्र तीर्थक्षेत्रे आपल्याकडे आहेत, हे सौंदर्य देश-परदेशात पोहोचविण्याचे काम आपल्याला करायचे आहे आणि हा महोत्सव त्यादृष्टीने महत्वाचा आहे.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक आल्यावर रोजगार निर्माण होतात, मात्र पर्यटन क्षेत्रात कमी गुंतवणूकीत अधिक रोजगार निर्माण होतात. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता या व्यवसायात आहे. पर्यटन क्षेत्रात पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर येण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. राज्याला पर्यटन क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आणण्याचे कार्य पुढील ५ वर्षात करण्यात येईल.मुंबई येथे आयोजित वेव्हज परिषदेमुळे क्रिएटर्स इकॉनॉमिमध्ये महाराष्ट्र महत्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करताना आपल्या सांस्कृतिक विविधता कंटेन्ट क्रिएटर्सच्या माध्यमातून जगभरात पोहोचविण्याचे प्रयत्न व्हावेत. पर्यटकाला स्थानिक वैशिष्ठ्याचा परिचय करून दिल्यास पर्यटक त्या त्या भागाकडे वळेल आणि पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महाबळेश्वर निसर्गाने समृद्ध असून पर्यटनाची अमर्याद क्षमता इथे आहे. मुनावळे येथे जलपर्यटनालाही चांगला प्रतिसाद मिळतो आहे. पर्यटकांना इथल्या निसर्गासोबत इथल्या कला, संस्कृती, इतिहास आणि खाद्यपदार्थांचा आनंद घेता येईल. इथल्या भूमीपुत्राला पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होईल

### महाबळेश्वर देशातील उत्तम पर्यटनस्थळ

महाबळेश्वर हे देशातील सर्वोत्तम पर्यटनस्थळ असून त्याचे मोठ्या प्रमाणात मार्केटिंग करण्याची गरज आहे. महाबळेश्वर हे नवे गिरीस्थान म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पर्यटनाच्या क्षेत्रातील स्कुबा डायव्हिंगसारख्या नव्या कल्पना पुढे आणून राज्यातील पर्यटनाला चालना देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. कोयना बॅकवॉटर संबंधी असणारी बंधने दूर केल्याने तेथे चांगली पर्यटन व्यवस्था उभी राहत आहे. पुढील महापर्यटन उत्सव कोयना बॅकवॉटर क्षेत्रात घेण्यात येईल व पर्यटकांना या भागातील निसर्ग सौंदर्याचा आणि जल क्रीडांचा अनुभव घडविण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

आणि आपल्या कुटुंबासोबत भूमातेची सेवा करण्याची संधी मिळेल. तीन दिवसात महोत्सवला पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यटन महोत्सवाच्या माध्यमातून इथल्या पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.राज्य शासनाने लोकाभिमुख योजनांना चालना देण्यासोबत गड-किल्ले संवर्धनाला चालना देण्याचे कार्य केले. पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी देखील प्रयत्न होत आहेत. भिलार येथे पुस्तकांचे गाव, मांघर येथे मधाचे गाव आहे. इथे सर्वोत्तम स्ट्रॉबेरी उत्पादन होते, वेण्णा लेकचे सौंदर्य आहे, लोकसंस्कृतीचे विविध रंग आहेत. हे सर्व एकाच ठिकाणी आणण्याचे काम महापर्यटन उत्सवाच्या माध्यमातून झाले आहे. अत्यंत नेटके नियोजन आणि सुरक्षित पर्यटन यामुळे हा महापर्यटन उत्सव वैशिष्ट्यपूर्ण ठरला. महाबळेश्वरला नवे आणि सुंदर पर्यटनस्थळ म्हणून विकसित कारण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, महाबळेश्वर हे पर्यटकांच्या आवडीचे ठिकाण आहे. महापर्यटन उत्सवाला पर्यटकांचा चांगला प्रतिसाद लाभल्याने महोत्सवाचा विस्तार करून पुढल्यावर्षी अधिक पर्यटक येतील याचा प्रयत्न व्हावा. पर्यटन क्षेत्रातील अभिनव कल्पना या महोत्सवात पाहायला मिळाल्या. परदेशातील पर्यटनाच्या उत्तम संकल्पनादेखील पर्यटन विभागाने स्वीकाराव्यात अशी सूचना त्यांनी केली.

## महाराष्ट्र दिन व महात्मा फुले जयंतीनिमित्त मुरुड येथील अभ्यासिकेला पुस्तके व कुलर भेट

आरंभ मराठी/मुरूड




मुरुड येथे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून माळी समाजाच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त मुरुड ग्रामपंचायत मार्फत चालविण्यात येत असलेल्या अभ्यासिकेस स्पर्धा परीक्षेच्या मुलांना मागणीनुसार पुस्तके व कुलर भेट देण्यात आले. मुरुड शहरामध्ये सर्व समाजाच्या वतीने अनेक महापुरुषांच्या जयंती साजरी केल्या जातात. या सर्व जयंती मध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. तसेच भव्य दिव्य मिरवणुकी सुद्धा काढल्या जातात. या मिरवणुकीसाठी प्रचंड पैसा खर्च केला जातो. मिरवणूक काढण्यामध्ये सर्वांचा हेतू हा सकारात्मकच असतो. परंतु बऱ्याचवेळा या मिरवणुकीत डॉल्बी ,तडमताशा तालावर युवकांची टीम नशापान करून नाचत असते. मिरवणूक पाहण्यासाठी मुरुड शहरातील आणि परिसरातील अनेक शालेय विद्यार्थी ,अनेक भगिनी व नागरिक आलेले असतात. याचे भान सुद्धा या तरुणांना राहत नाही. यामुळे कुठलाही गैरप्रकार होऊ नये म्हणून गावातील सर्व सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते आणि पोलीस यंत्रणेला सतर्क राहावे लागते. अशावेळी पोलीस यंत्रणेवर प्रचंड ताण येतो. यावेळी येथील माळी समाजाच्या बांधवांनी महात्मा फुले जयंती निमित्त मिरवणुकीवरचा खर्च टाळून त्या पैशातून मुरुड शहरातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या मुलांसाठी स्पर्धा परीक्षेची पुस्तके अभ्यासिकेला मोफत देऊन समाजापुढे नवीन आदर्श निर्माण केला आहे.

## तेरणा अभियांत्रिकीच्या ईटीसी विभागाचा पालक मेळावा उत्साहात

आरंभ मराठी / धाराशिव

तेरणा अभियांत्रिकीच्या ई टी सी विभागातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा मंगळवारी (दि.२९) आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आला. या मेळाव्यासाठी अनेक पालक, विद्यार्थी आणि विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे पालक शशिकांत डोके , सौ. अलका मोरे, आणि कॉलेजचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने हे प्रमुख पाहुणे म्हणून तर ई टी सी विभाग प्रमुख डॉ.प्रशांत कोल्हे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा.नयना भोसले-वाघ, प्रा.वंदना मैंदर्गी आणि प्रा.वर्षा बोन्दर यांनी विभाग प्रमुख डॉ.कोल्हे यांच्या मार्गदर्शना खाली केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.बोन्दर यांनी तर प्रास्ताविक प्रा.नयना भोसले यांनी केले. गुगल मीट वर आयोजित या ऑनलाइन कार्यक्रमाला सर्व पालक आणि विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. अनुष्का मसलेकर हिच्या सुरेल सरस्वती स्तवनाने



कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी बोलताना विभाग प्रमुख डॉ.कोल्हे यांनी विभागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व कर्मचारी कटिबद्ध असल्याचे नमूद केले. या प्रसंगी उपस्थित पालकांची समयोचित भाषणे झाली. प्राचार्य डॉ.माने यांनी विभागातील सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत ई टी सी विभाग विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या अनेक उपक्रमांचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा.मैंदर्गी यांनी आभार प्रदर्शन केले.

## प्रमोद महाजन यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**धाराशिव-** प्रमोद महाजन हे वक्तशीरपणा, अमोघ वक्तृत्व, उत्तम संघटन कौशल्य व अभ्यासू नेतृत्व यासाठी ओळखले जात होते. भारताच्या राजकारणात भावी पंतप्रधान म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. आजच्या राजकारणात निश्चित त्यांची आवश्यकता होती. असे मत प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांनी व्यक्त केले. येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात स्वर्गीय प्रमोद महाजन यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करताना ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांची उपस्थिती होती. प्रमोद महाजनांना एक अभ्यासू राजकारणी म्हणून ओळखले जात होते. प्रत्येक विषयामध्ये ते सखोल अभ्यास करून आपले मत व्यक्त करत. प्रमोद महाजनांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.प्रशांत गुरव यांनी केले तर आभार प्रा. डॉ. देवकर अनिल यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक , कर्मचारी उपस्थित होते.

## पडवळ यांच्या स्वाध्याय आयुष्याचा पुस्तकाचे प्रकाशन

आरंभ मराठी / धाराशिव

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे मान्यवरांच्या उपस्थितीत स्वाध्याय आयुष्याचा पुस्तकाचे प्रकाशन झाले.धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांनी आपल्या शिक्षक सेवा आयुष्यातील अनुभवांचे लेखन करून इतर शिक्षकांना प्रेरणा दिली आहे. एकूण अठरा शिक्षकांनी आपले अनुभव शब्दबद्ध केले आहेत.या सर्वांना लिहिते करण्याचे काम या पुस्तकाचे संपादक आणि शिक्षक व साहित्यिक हणमंत पडवळ यांनी केले.या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून मा.श्री.गणपतराव मोरे, शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये डायटचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, कुंभार साहेब विभागीय मंडळ लातूर, धनंजय सराफ सहायक शिक्षण उपनिरीक्षक उपसंचालक कार्यालय लातूर, नितीन तावडे, अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद शाखा धाराशिव,दत्तप्रसाद जंगम, भारत देवगुडे विस्तार अधिकारी जि.प.धाराशिव आणि शिक्षक नेते




पडवळ एल.बी.तसेच शिक्षक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे उपस्थित होते.मा.गणपतराव मोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना महाराष्ट्रातील हा पहिला प्रयोग असून महाराष्ट्र शासन सुद्धा या उपक्रमाचे अनुकरण करू शकते.असे गौरवोद्गार काढून संपादक हणमंत पडवळ यांचे व लिहित्या शिक्षकांचे कौतुक केले.प्राचार्य दयानंद जटनुरे व शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांनी देखील सर्व लेखक शिक्षकांचे कौतुक व अभिनंदन केले.सर्व लेखक शिक्षकांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुस्तक प्रत देऊन सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी नितीन तावडे,दत्तप्रसाद जंगम, पडवळ एल.बी यांची देखील भाषणे झाली.

# अभिनय जितके प्रामाणिकपणे कराल,तितके ते उत्तम होईल

आरंभ मराठी/मुंबई

मुंबई, एआय तंत्रज्ञानामुळे चित्रपटसृष्टीत मोठा बदल घडत आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे अभिनेत्याशिवाय दृश्य चित्रित करणे शक्य झाले आहे. चित्रपटसृष्टीत काम करताना तुमचे काम तुम्ही जितके प्रामाणिकपणे कराल, तितके ते उत्तम होईल असल्याचे सांगून 'अभिनयाची कला' या विषयावरील त्यांच्या अतिशय सहजसोप्या आणि उपयुक्त सल्ल्यांनी अभिनेता आमिर खान यांनी वेव्हज २०२५ मध्ये अनेकांची मने जिंकली.

आमिर खान पुढे म्हणाले की, मी प्रशिक्षित अभिनेता नाही. मी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये जाण्याची माझी इच्छा होती, पण जमलं नाही. मी माझ्या वाटचालीत या लहान-लहान गोष्टी शिकलो, ज्या माझ्यासाठी उपयोगी ठरल्या.चित्रपट निर्मितीच्या भविष्याबद्दल बोलताना, आमिर खान म्हणाले की, एआय तंत्रज्ञानामुळे आता अभिनेत्याशिवाय दृश्य चित्रित करणे शक्य झाले आहे! एआय आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने नंतर दृश्यात अभिनेत्याला जोडले जाऊ शकते.एखाद्या अभिनेत्यासाठी सर्वात पहिले आणि महत्त्वाचे काम म्हणजे त्या पात्राच्या मनात प्रवेश करणे, असे या अष्टपैलू अभिनेत्याने सांगितले, ज्यांनी गेल्या अनेक वर्षांत साकारलेल्या अनेक अविस्मरणीय भूमिकांची भारतीय सिनेमाला भेट दिली आहे. आणि त्या भूमिकेच्या अंतरंगात ते कशा प्रकारे सामावून जातात? त्यावर या सिनेक्षेत्राला वाहून घेतलेल्या अभिनेत्याचे उत्तर आहे, ''मी स्क्रिप्टसोबत खूप वेळ घालवतो. मी पटकथा पुन्हा पुन्हा वाचतो. जर पटकथा चांगली असेल, तर तुम्हाला त्या पात्राची समज येईल, त्याचे भौतिक स्वरुप, वृत्ती इत्यादी सर्व काही त्यातूनच येईल''. याव्यतिरिक्त, दिग्दर्शकाशी पात्राबद्दल आणि कथेबद्दल चर्चा केल्याने देखील कल्पना येते.अतिशय परिश्रम करण्याच्या आपल्या वृत्तीविषयी स्पष्टीकरण देताना आमिर खान यांनी सांगितले, ''माझी स्मरणशक्ती कमी आहे. त्यामुळे मी हाताने संवाद लिहितो. सर्वात आधी मी अवघड दृश्ये करायला घेतो. संवादांचे पाठांतर झालेच पाहिजे. पहिल्या दिवशी मी केवळ त्यावर काम करतो, तीन ते चार महिने मी दररोज तेच करत राहतो आणि मग त्यामध्ये शिरतो. संवाद हे तुमच्यामध्ये सामावले पाहिजेत. ते तुमचे स्वतःचे वाटले पाहिजेत. ज्यावेळी ते लिहिले गेले तेव्हा ते पटकथाकाराचे होते. पण नंतर ते तुमचे झाले आहेत. ज्यावेळी तुम्ही एक ओळ पुन्हा पुन्हा उच्चारता, तेव्हा तुम्हाला जाणीव होते की हे तुम्ही अनेक प्रकारे करू शकता.कलाकारांसाठी सर्वात कठीण काम कोणते असते? त्यावर आमिर खान म्हणाले, की कलाकाराला दररोज पुन्हा पुन्हा त्याच उत्कटतेने भावनिक अभिनय सादर करावा लागणे.नवोदित कलाकारांसाठी आमिर खान यांनी आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आणि ती म्हणजे - ''तुमचे काम तुम्ही जितके प्रामाणिकपणे कराल, तितके ते उत्तम होईल''.तर, मग खुद्द आमिर खान त्यांच्या दृश्यांचा सराव कसा करतात?याचे उत्तर असे, की ''मी शॉट्स देण्यापूर्वी त्या दृश्याची कल्पना करतो आणि त्या दृश्यांचा सराव करत असताना मी कधीच आरशात पाहत नाही.''आतापर्यंतच्या सर्व चित्रपटांपैकी आमिर खान यांचा आवडता चित्रपट कोणता? अनेकांनी अंदाज लावलाच असेल, की तो चित्रपट 'तारे जमीन पर.




अभिनेता आमिर खान

## परंडा व भूम आगारासाठी नवीन बस देण्याची राहुल मोटेंची मागणी

आरंभ मराठी / परंडा

परांडा आणि भूम आगारासाठी लवकरात लवकर नवीन एसटी बस उपलब्ध करून देण्यात याव्या अशी मागणी माजी आमदार राहुल मोटे यांनी नुकतीच परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ महाव्यवस्थापक नितीन मैंद यांच्याकडे केली आहे. भूम व परांडा आगाराकड असणाऱ्या बसेस अत्यंत निकृष्ट स्थितीत खिळखिळ्या झालेल्या आहेत. धाराशिव जिल्ह्यासाठी काही काळापूर्वी नवीन एसटी बस उपलब्ध झाल्या आहेत, मात्र नवीन बसेस पैकी एकही बस परांडा विधानसभा मतदारसंघासाठी देण्यात आली नाही. परांडा विधानसभा मतदारसंघात नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मात्र अद्याप एकही बस सुरू झालेली नाही. जनतेच्या सोयीसाठी तातडीने आमच्या मागणीची दखल घेऊन एसटी बसेस परांडा विधानसभा मतदारसंघासाठी उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी मोटे यांनी केली आहे.

# वाढत्या उष्णतेचा भाजीपाला पिकावर परिणाम; प्रतवारी खराब,भाव मिळेना

## भाजीपाला उत्पन्नात घट तसेच रोगराईचा प्रादुर्भाव वाढला

रमेश नरवडे /आरंभ मराठी

**पळसप–भाजीपाला पिके उष्णतेसाठी अत्यंत संवेदनशील असतात या उष्णतेचा थेट परिणाम भाजीपाला पिकावर सध्या होताना दिसून येत आहे. अति उष्णतेमुळे पिकाची वाढ कमी होऊन उत्पादनात घट होत आहे. उष्णतेचा परिणाम आणि वाढत्या पाणीटंचाईमुळे मिरची ,टोमॅटो, भेंडी, कलिंगड, कोबी, फ्लावर यांसारख्या पिकांवर मोठा परिणाम होताना पाहायला मिळत आहे.**







यंदा पाऊसकाळ जास्त झाल्याने मे महिन्याच्या शेवटपर्यंत पाणी पुरेल या अंदाजाने पळसपसह परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकाची लागवड केली आणि यंदा अचानकपणे उष्णतेची तिव्रता वाढल्याने आणि सिंचनासाठीचे पाणी कमी झाल्याने त्याचा परिणाम सर्वच भाजीपाला पिकावर होताना दिसून येत आहे. अति उष्णतेमुळे पिकावर पाण्याचा ताण येऊन रोगाचा प्रादुर्भाव वाढून मिरची , भेंडी टोमॅटो यासारख्या पिकावर थ्रिप्स चे प्रमाण वाढणे , फुलगळ होणे ,अशा समस्या उद्धभवताना दिसून येत आहेत. परिणामी झाडाची पाने करपणे, पिकाची वाढ मंदावणे, फळाची वाढ कमी होणे, फळांचा कलर बदलणे, फळाची साईज कमी होणे आणि विविध रोगाचा प्रादुर्भाव होणे इत्यादी समस्या निर्माण झाल्याने उत्पादनात घट निर्माण होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उष्णतेचा भाजीपाला पिकावर परिणाम होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी पुढील गोष्टींची काळजी घेणे महत्वाचे आहे. पिकाला वेळेवर मुबलक पाणी देणे पिकाच्या चारही बाजूने कमी खर्चातील कापडी कंपाऊंड घेणे, किंवा चारही बाजूने उंच मक्यासारखे पिके लागवड करणे. नवीन लागवड करतांना सायंकाळीच्या वेळी लागवड करणे,सकाळी किंवा सायंकाळी पिकाला पाणी देणे, शक्य असेल तर पिकावर सावलीसाठी शेडनेट कापड , स्टँडवरचे क्रॉप कव्हर टाकणे , रोग,किडीवर नियंत्रण ठेवणे , सायंकाळीच्या वेळी फवारणी करणे इत्यादी उपाय योजना केल्यास आपल्या पिकाला उष्णतेपासून आणि इतर बाबीपासून संरक्षण होऊन पिकाला फायदा शकतो असे जाणकारांकडून सांगण्यात आले.

### रोगराईचा प्रादुर्भाव आणि उत्पन्नात घट

उष्णतेमुळे आपले पीक वाया जाऊ नये म्हणून पिकाला वेळेवर मुबलक पाणी देणे, जास्त केमिकल असणाऱ्या फवारणी टाळणे, पाणी आणि फवारणी करताना सकाळी किंवा सायंकाळची वेळ निवडणे शक्य असल्यास पिकावर सावलीसाठी नेटचे आच्छादन करणे इत्यादी काळजी घेणे.

–ज्ञानेश्वर सरडे
शेतकरी पळसप,

### पिकांची काळजी घेणे आवश्यक

मी माझ्या शेतात एक एकर भेंडी लागवड केली आहे. परंतू, जास्त उष्णतेमुळे मिरची पिकावर थ्रिप्स आणि माव्याचा प्रादुर्भाव वाढल्याने उत्पादनात घट तर झालीच आहे त्याच बरोबर फवारणीच्या खर्चात दुप्पट वाढ होत आहे.

–संजय चव्हाण (बावी)
भाजीपाला पीक सल्लागार ,

### उन्हामुळे मिरचीची फुलगळ

मी दर वर्षी एक एकर शेतामध्ये मिरची लागवड करत असतो. मात्र प्रत्येक वर्षीच्या तुलनेत यंदा अतिउष्णतेमुळे मिरची पिकात फुलगळ सारखी समस्या निर्माण झाल्याने उत्पादन कमी मिळण्याची शक्यता आहे.

–सुनील साठे
शेतकरी पळसप,

# महाराष्ट्र दिनानिमित्त तुगांव जिल्हा परिषद शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव तालुक्यातील तुगाव येथील जिल्हा परिषद शाळेत गुरुवारी (दि.१) महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून मोठ्या उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांच्या स्वागतानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक शिवदास चौगुले यांनी केले. यावेळी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेमध्ये वर्षभर राबवले जात असलेले विविध उपक्रम व शाळेची होत असलेली यशस्वी वाटचालीबाबत माहिती सांगितली. या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ११ विद्यार्थी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून, यामध्ये देवयानी संजय गडकर, अर्णव महेश लोमटे, अर्णव सचिन पौळ, स्वरांजली संजय शेंडगे,अन्वेशा चंद्रकांत शेंडगे, स्वरा बालाजी शितोळे, राजवर्धन दयानंद भुतेकर,आदर्श पांडुरंग भुतेकर,प्रांजल प्रकाश गडकर,राधा गणेश नलवडे, प्रथमेश रामकृष्ण गडकर यांचा समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण प्रेमी ग्रामस्थ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच मार्गदर्शक शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक यांचाही सत्कार करण्यात आला. या यशस्वी विद्यार्थ्यांना अनिल भुतेकर माजी सरपंच तसेच संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती,धाराशिव यांनी मार्गदर्शन करत शिक्षकांचे कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सचिन लोमटे यांनी मनोगत व्यक्त करताना यशस्वी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे अभिनंदन करून जिद्द,चिकाटी, मेहनत,आणि अपयशातूनच विद्यार्थी यशस्वी होतो असे मत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी बालाजी शितोळे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या सर्व विद्यार्थ्यांना सहशिक्षक नामदेव डुकरे, सुलभकुमार भगत, अमोल वैद्य तसेच शिवदास चौगुले, बाहुबली नवले, व दत्तात्रय पडवळ, नवनाथ बचाटे व शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक प्रमोद अनपट यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास केंद्रप्रमुख,जे.के. जाकते शा.व्य.समिती अध्यक्ष,राजेंद्र डोंगरे, उपाध्यक्षा प्रीती हाजगुडे, सदस्य,मीराताई शितोळे, अंगणवाडी ताई जाणकाताई भुतेकर विद्यार्थी पालक,पोपट भुतेकर, संजय गडकर, महेश लोमटे, चंद्रकांत शेंडगे संजय शेंडगे, रोहिणी शेंडगे,शितल भुतेकर, रोहिणी नलवडे, संगीता काकडे,प्रियंका काकडे व विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# धानुरी येथे भीमजयंती उत्सवाची भव्य मिरवणुकीने सांगता



आरंभ मराठी / लोहारा

लोहारा तालुक्यातील धानुरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव जयंती मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि.३०) भव्यदिव्य जल्लोषात डीजेच्या वाद्यात, लेझीमच्या लोकनृत्याचे सादरीकरण करत मिरवणूकीने भीम जयंती उत्सवाची सांगता झाली. प्रारंभी मंडळ अध्यक्ष सरपंच प्रविण थोरात यांच्या हस्ते गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन संपन्न झाले. वागदरी लेझीम पथक, कोरळ येथील रत्नदीप लेझीम पथकाच्या गाण्याच्या व पारंपारिक वाद्य ढोल–ताशांच्या तालावर लोकनृत्याचे सादरीकरण करत भव्यदिव्य मिरवणूक सोहळ्याला सुरुवात झाली. भीम नगर येथील मंडळाच्या वतीने बाबासाहेबांच्या गीतावर डीजेच्या तालावर नृत्य सादरीकरण करून आनंदी वातावरणात भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने बाबासाहेबांचा फोटो तथागत भगवान बुद्ध यांचे वृक्षाखाली ध्यान साधना करत असलेले डेकोरेशन करण्यात आले होते. या भव्यदिव्य मिरवणुकीत प्रतिवर्षाप्रमाणे महिलांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिसून आला. तर मंडळाच्या वतीने मिरवणूक सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कार्यकत्यांनी परिश्रम घेतले. पोलीस प्रशासनाच्या वतीने सहायक पोलिस निरीक्षक कुकालरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. डीजे, लेझीमची ताल, फटाक्यांच्या आतिषबाजीने भव्यदिव्य मिरवणूकीने भीम जयंती उत्सवाची सांगता झाली.

# कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील एव्हीजीसीएक्सआर क्षेत्रातील बदलता प्रवाह-परिसंवादातील सूर




आरंभ मराठी / मुंबई

**कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) नवीन तंत्रज्ञानामुळे शिक्षण, उद्योग क्षेत्रात नवनवीन संशोधन सुरू झाले आहे.ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्स्टेंडेड रिॲलिटी क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. ॲनिमेशन क्षेत्रात एआयचा वापर वाढला असला तरी सर्जनशीलता येणार नाही, ते कृत्रिम दिसेल, नैसर्गिक हे नैसर्गिकच राहणार असल्याचे या परिसंवादात तज्ज्ञांनी मत मांडले.**

बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्समधील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पार पडलेल्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषदेत 'चेंजिंग डायनामिक्स ऑफ एव्हीजीसी एक्सआर इन एआय एरा : हाऊ टू ब्रिज इंडस्ट्री अँड अकॅडमी' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ ब्रियना यान्हौसे, अमेरिकेतील ॲनिमेशन तज्ञ प्रमिता मुखर्जी, अस्पाचे संचालक संजय खिमेसरा सहभागी झाले होते. तर समन्वयक म्हणून विनिता बचानी यांनी काम पाहिले.

### कृत्रिम बुद्धिमत्ता ही संधी आहे, धोका नाही - प्रमिता मुखर्जी

ॲनिमेशन हे सर्जनशील क्षेत्र आहे. एआय हे रिपिटेटिव्ह, प्रक्रियात्मक कामे, डेटा ट्रान्सफर, प्लगइन लेखन या गोष्टींसाठी उपयुक्त आहे, पण सर्जनशील क्षेत्र अजूनही मानवकेंद्रित राहील. सर्जनशील कलाकारांसाठी संधी कमी होणार नाहीत. कृत्रिम बुद्धिमत्तेकडे आपल्या कौशल्यात वाढ करून देणारी संधी म्हणून बघायला हवे, असे मत ॲनिमेशन क्षेत्रातील अमेरिकेतील ॲनिमेशन तज्ज्ञ प्रमिता मुखर्जी यांनी व्यक्त केले.

### रोजगाराभिमुख शिक्षण आवश्यक–संजय खिमेसरा

देशाच्या अर्थव्यवस्थेत शिक्षणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, नवसंशोधनाला चालना देणे आणि उद्योगांच्या गरजा पूर्ण करणे महत्वाचे आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( २०२०) प्रभावीपणे राबवण्यासाठी विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम हाती घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी कौशल्यवृद्धी, प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव आणि रोजगारक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल, असे अस्पाचे संचालक संजय खिमेसरा यांनी सांगितले.

### कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे सर्जनशीलतेचा नवा अध्याय– ब्रियना यान्हौसे

विद्यार्थ्यांनी एक एआयचा वापर नवीन कल्पना, संशोधन आणि कलेतील नव्या कल्पकता शोधण्यासाठी करावा. विद्यार्थ्यांना शाळा,महाविद्यालयातसुद्धा नवीन तंत्रज्ञान याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थी तंत्रज्ञानासोबत लवकर जुळवून घेऊन सर्जनशीलतेसह नेतृत्व करतील, असे श्रीमती यान्हौसे यांनी सांगितले.

# महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतीकार्यातून मानवधर्माची शिकवण मिळते

## भैरवनाथ कानडे यांचे मत

आरंभ मराठी / जळकोट

बाराव्या शतकामध्ये सामाजिक समतायुग निर्माण करणारे आद्य समाज सुधारक व धर्मसुधारक जगतज्योती महात्मा बसवेश्वर हे थोर तत्त्वज्ञ , मानवधर्माची शिकवण देणारे लोककल्याणकारी सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते.आपल्या विद्रोही विचार कार्यातून त्यांनी समाजातील जातीव्यवस्था, कर्मकांड व विषमतेवर प्रहार केला. त्यांचा कृतीशील विचार हा जागतिक लोकशाही प्रणाली व सामाजिक न्यायाला विस्तृत करणारा असुन त्यांच्या महान कार्यातून मानवधर्माची शिकवण मिळते, असे मत प्रेरणादायी वक्ते तथा साहित्यिक भैरवनाथ कानडे यांनी व्यक्त केले.

तुळजापूर तालुक्यातील हंगरगा नळ येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात " म .बसवेश्वर यांचे जीवन व कार्य " या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अतुल कलशेट्टी होते . पुढे बोलताना कानडे म्हणाले की , समाजातील भेदभाव नष्ट व्हावा यासाठी महात्मा बसवेश्वरांनी पुढाकार घेतला. समाजातील विषमता संपवून टाकण्याचा त्यांचा मनोदय होता.त्यांच्या क्रांतिकार्यामुळे गेली शेकडो वर्ष अपेक्षित वर्तन बदलापासून दूर असलेला समाज नव्या वळणावर उभा झाला.या महान सुधारणावादी क्रांतीकारकांचे विचार अखंडपणे मानवी कल्याणासाठी तेवत राहणारे आहेत .याप्रसंगी प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. दरम्यान म . बसवेश्वर जयंती उत्सव कमिटी हंगरगा नळ यांच्या वतीने संजय वाघोले यांनी श्री कानडे यांचा सत्कार केला. कार्यक्रमास उपसरपंच दयानंद चौगुले, संजय वाघोले,बसवराज पाटील, प्रवीण चौगुले, अमोल वाघोले, योगेश मुदगडे, पंकज पाटील, रामेश्वर मगे,राजेंद्र कलशेट्टी , महादेव चौगुले ,अमोल बिराजदार ,महादेव लिमशेंडे , मुख्याध्यापक मनोहर घोडके , पीयुष नवगिरे , सिद्धेश्वर वाघोले , दत्ता मुदगडे ,अनिल राजमाने , समर्थ पाटील , संतोष कलशेट्टी , चेतन पाटील , संदीप वाघोले , अजय कलशेट्टी ,शिवराज आप शेट्टी ,युवराज शिरगुरे , अविनाश पाटील , किरण चौगुले आदींसह युवक , महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पंकज पाटील यांनी केले.

